RNI No. MAHBIL /2009/31732

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## भाग चार-अ

वर्ष ५, अंक ४]     गुरुवार ते बुधवार, मार्च २१-२७, २०१९/फाल्गुन ३०, शके १९४०-चैत्र ६, शके १९४१     [पृष्ठे ४

[ किंमत : रुपये ९.०० ]

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### महसूल व वन (मदत व पुनर्वसन) विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ४ सप्टेंबर २०१८

### अधिसूचना

**आधार (वित्तीय व इतर अर्थसहाय्य, लाभ आणि सेवा यांचे लक्षित वितरण) अधिनियम, २०१६.**

क्रमांक एससीवाय-११/२०१७/प्र.क्र. ५७/म-११.— ज्याअर्थी, सेवा किंवा लाभ किंवा अर्थसहाय्य यांचा वितरणासाठी ओळख पटविण्याकरिता आधारचा वापर केल्याने शासनाची वितरण प्रक्रिया सोपी होते. त्यात पारदर्शकता येते आणि कार्यक्षमता वाढते, आणि लाभार्थ्यांना त्यांचे हक्क सोईस्कर आणि अखंडित पद्धतीने थेट प्राप्त होणे शक्य होते ; आधारमुळे एखाद्या व्यक्तीची ओळख पटविण्यासाठी लागणारी बहुविध कागदपत्रे सादर करण्याची गरज भासत नाही ;

आणि ज्याअर्थी, आधार (वित्तीय व इतर अर्थसहाय, लाभ आणि सेवा यांचे लक्ष्यित वितरण) अधिनियम, २०१६ (सन २०१६ चा क्र. १८) (यात यापुढे ज्याचा निर्देश ''उक्त अधिनियम'' असा करण्यात आला आहे), याच्या कलम ७ मध्ये अशी तरतूद केली आहे की, भारताच्या एकत्रित निधीतून ज्याच्यासाठी खर्च केला जातो किंवा त्यातील जमा रकमा या त्या निधीचा भाग असतात असे अर्थसहाय्य, लाभ किंवा सेवा मिळविण्यासाठीची शर्त म्हणून एखाद्या व्यक्तीची ओळख प्रस्थापित करण्याच्या प्रयोजनार्थ केंद्र सरकारला, किंवा, यथास्थिती राज्य शासनाला, अशा व्यक्तीस अधिप्रमाणन प्रक्रिया पार पाडण्यास, किंवा आधार क्रमांक असल्यास त्याचा पुरावा सादर करण्यास, किंवा, ज्या व्यक्तीस आधार क्रमांक नेमून देण्यात आलेला नाही अशा व्यक्तीने आधार क्रमांकाच्या नोंदणीसाठी अर्ज करण्यास फर्मावील ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ७ च्या परंतुकामध्ये अशी तरतूद केली आहे की, एखाद्या व्यक्तीस आधार क्रमांक नेमून देण्यात आलेला नसल्यास, अशा व्यक्तीस अर्थसहाय्य, लाभ किंवा सेवा यांचे वितरण करण्यासाठी तिच्या ओळखनिश्‍चितीची पर्यायी आणि आधारभूत साधने देता येतील ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाकडून, यास जोडलेल्या अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेल्या राज्य आपत्ती प्रतिसाद निधीतून नैसर्गिक आपत्तीसाठी म्हणून महसूल व वन विभागाद्वारे अर्थसहाय्य, लाभ आणि सेवा देण्यात येते, ज्यात भारताच्या एकत्रीकृत निधीतूनही खर्च केला जातो ;

आता त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ७ च्या तरतुदीच्या अनुरोधाने, महाराष्ट्र शासन, याद्वारे महसूल व वन विभागाद्वारे खालीलप्रमाणे अधिसूचित करीत आहे :—

(१) यास जोडलेल्या उक्त अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेल अर्थसहाय्य, लाभ किंवा सेवा मिळविण्याची इच्छा असणाऱ्या प्रत्येक व्यक्तीस याद्वारे आधार क्रमांक असल्याचा पुरावा सादर करावा लागेल किंवा आधार अधिप्रमाणन प्रक्रिया पार पाडावी लागेल.

(२) (एक) ज्याला अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेले अर्थसहाय्य, लाभ किंवा सेवा मिळविण्याची इच्छा आहे आणि ज्याने अजूनही आधार क्रमांक मिळविण्यासठी नाव नोंदविलेले नाही अशा कोणत्याही व्यक्तीस, जर ती आधार (वित्तीय व इतर अर्थसहाय्य, लाभ आणि सेवा यांचे लक्ष्यित वितरण) अधिनियम, २०१६ (सन २०१६ चा क्र. १८) च्या कलम ३ च्या तरतुदींनुसार आधार क्रमांक मिळण्यास हक्कदार असेल तर, अशा

अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेले अर्थसहाय्य, लाभ किंवा सेवा मिळविण्यासाठी अर्ज सादर करण्यापूर्वी आधार क्रमांक मिळविण्यासाठी नाव नोंदवावे लागेल. अशा व्यक्तींना विशिष्ट ओळख क्रमांक प्राधिकरण, भारत सरकार यांच्याद्वारे नेमण्यात आलेल्या प्रबंधकाद्वारे आधार क्रमांक नोंदणीची सेवा पुरविण्यात येत असलेल्या अशा जवळपासच्या कोणत्याही आधार क्रमांक नोंदणी केंद्रास *https://uidai.gov.in* वर यादी उपलब्ध आहे) किंवा विशेष नाव नोंदणी शिबिरास भेट देता येईल.

(दोन) आपल्या गट किंवा तहसील किंवा तालुका या ठिकाणी नाव नोंदणी केंद्र उपलब्ध नसल्यामुळे जर एखाद्या व्यक्तीस नाव नोंदणी करता आली नाही तर, तिला आपली नाव नोंदणीसाठीची विनंती विभागाच्या पदसिद्ध क्षेत्र अधिकाऱ्याकडे किंवा विभागाने विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही वेब पोर्टलवर नोंदविता येईल.

(३) पात्र व्यक्तीस आधार क्रमांक नेमून देण्यात येईतोपर्यंत ओळख पटविण्यासाठीची पुढील पर्यायी आणि आधारभूत साधने सादर करण्याच्या अधीनतेने, उक्त अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेले अर्थसहाय्य, लाभ किंवा सेवा देण्यात येतील :—

(एक) त्याने नाव नोंदविलेले असल्यास आधार नोंदणीची ओळखपत्र पावती ; किंवा

(दोन) पुढीलपैकी कोणत्याही कागदपत्रांसह परिच्छेद २ च्या उप-परिच्छेद (दोन) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे आधार नोंदणीसाठी केलेल्या विनंतीपत्राची प्रत :—

(क) भारताच्या निवडणूक आयोगाने दिलेले मतदार ओळखपत्र ; किंवा

(ख) आयकर विभागाद्वारे देण्यात आलेले स्थायी खाते क्रमांक (पॅन) कार्ड ; किंवा

(ग) पारपत्र (पासपोर्ट ) ; किंवा

(घ) मोटार वाहन अधिनियम, १९८८ (१९८८ चा ५९ ) अन्वये लायसन प्राधिकरणाने दिलेले वाहन चालन लायसन ; किंवा

(ङ) **राजपत्रित** अधिकाऱ्याने अधिकृत नाममुद्रित पत्रावर दिलेले त्या व्यक्तीचा फोटो असलेले ओळखप्रमाणपत्र ; किंवा

(च) फोटो असलेले बँकेचे पासबुक.

**अनुसूची**

| अ. क्र. (१) | मागणी क्र. सी-६,२२४५ नैसर्गिक आपत्ती निवारणार्थ सहाय्य (योजनेत्तर) (२) |
|---|---|
| १ | अवर्षण, १०१ अनुग्रह सहाय्य (९१) राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या मानकांनुसार खर्च, (९१) (०५) पीक नुकसानीमुळे शेतकऱ्यांना मदत, ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर) (अनिवार्य ) (२२४५ २४३४) |
| २ | ०२, पूर, चक्रीवादळे, इत्यादी, १०१ अनुग्रह सहाय्य (९१) राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या मानकांनुसार खर्च, (९१) (०१) रोख भत्ता, मृत व्यक्तींच्या कुटुंबीयांना सहाय्य व जखमींना मदत, ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर) (अनिवार्य) (२२४५ ०१५५) |
| ३ | ०२, पूर, चक्रीवादळे, इत्यादी, १०१ अनुग्रह सहाय्य (९१) राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या मानकांनुसार खर्च, (९१) (०२) राहत केंद्रांमध्ये निवारा, अन्न, वस्त्र, औषधे, इत्यादींचा पुरवठा, ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर) (अनिवार्य ) (२२४५ ०२१७) |
| ४ | ०२, पूर, चक्रीवादळे, इत्यादी, १०१ अनुग्रह सहाय्य (९१) राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या मानकांनुसार खर्च, (९१) (०४) इतर बाबी (अनिवार्य) ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर) (२२४५ ०२४४) |
| ५ | ०२, पूर, चक्रीवादळे, इत्यादी, १०१ अनुग्रह सहाय्य (९१) राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या मानकांनुसार खर्च, (९१) (०५) पीक नुकसानीमुळे शेतकऱ्यांना मदत, (अनिवार्य ) ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर) (२२४५ २४५२) |
| ६ | ०२, पूर, चक्रीवादळे, इत्यादी, ११३ घरदुरुस्ती/पुनर्बांधणी यासाठी सहाय्य (९१) राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या मानकांनुसार खर्च, (९१) (०१)घरांची दुरुस्ती/पुनर्बांधणी यासाठी सहाय्य, (अनिवार्य) ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर) (२२४५ ०२७१) |
| ७ | ०२, पूर, चक्रीवादळे, इत्यादी, ११७ पशुधन खरेदीसाठी शेतकऱ्यांना सहाय्य (९१) राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या मानकांनुसार खर्च, (९१) (०१) मृत जनावरांऐवजी पशुधन खरेदीसाठी अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना सहाय्य, (अनिवार्य) (२२४५ ०३१५) ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर) |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अरुण कोल्हे,**
शासनाचे वित्तीय सल्लागार व सहसचिव.

## REVENUE AND FOREST, RELIEF AND REHABILITATION DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajuguru Chowk
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 4th September 2018

*NOTIFICATION*

AADHAAR (TARGATED DELIVERY OF FINANCIAL AND OTHER SUBSIDIES, BENEFITS AND SERVICES ) ACT, 2016.

No. SCY-11/2017/C.R.57/M-11.— Whereas the use of Aadhaar as identifier for delivery of services or benefits or subsidies simplifies the Government delivery processes, brings in transparency and efficiency, and enables beneficiaries to get their entitlements directly in a convenient and seamless manner; Aadhaar obviates the need for producing multiple documents to prove one's identity ;

And whereas section 7 of the Aadhaar (Targeted Delivery of Financial and Other Subsidies, Benefits and Services) Act, 2016 (No.18 of 2016) (hereinafter referred to as "the said Act"), provides that the Central Government or, as the case may be, the State Government may, for the purpose of establishing identity of an individual as a condition for receipt of a subsidy, benefit or service for which the expenditure is incurred from, or the receipt there from forms part of the Consolidated Fund of India, require that such individual undergo authentication, or furnish proof of possession of Aadhaar number or, in the case of an individual to whom no Aadhaar number has been assigned, such individual makes an application for enrolment;

And whereas, the proviso to section 7 of the said Act provides that, if an Aadhaar number is not assigned to an individual, the individual shall be offered alternate and viable means of identification for delivery of the subsidy, benefit or service ;

And whereas, the Government of Maharashtra in the Revenue and Forests Department gives subsidies, benefit and services on account of natural calamities from the State Disaster Response Fund specified in Schedule appended hereto, which involves expenditure from the Consolidated Fund of India ;

Now, therefore, in pursuance of the provisions of section sections 7 of the said Act, the Government of Maharashtra in the Revenue and Forests Department hereby, notifies as follows, namely :—

1. Every individual desirous of availing subsidies, benefits or services specified in said Schedule, hereto hereby required to furnish proof of possession of Aadhaar number or undergo Aadhaar authentication.

2. (*i*) Any individual desirous of availing subsidies, benefits or services specified in the Schedule who is not yet enrolled for obtaining Aadhaar number shall have to enrol for obtaining Aadhaar number before submitting an application for the receipt of subsidies, benefits or services specified in such Schedule in case he is entitled to obtain Aadhaar number as per the provisions of section 3 of the Aadhaar (Targeted Delivery of Financial and other Subsidies, Benefits and Services) Act, 2016 (No.18 of 2016). Such individuals may visit any Aadhaar enrolment centre (list available on *https://uidai.gov.in* or special enrolment camp in the vicinity wherein Aadhaar enrolment is being facilitated by Registrars appointed by Unique Identification Authority of India.

(*ii*) In case, individuals are not able to enrol due to non-availability of enrolment centers in their Block or Tehsil or Taluka, they may register their requests for enrolment to Department's designated field offices or any web-portal specified by the Department.

3. Till the time Aadhaar number is assigned to the eligible individual subsidies, benefits or services specified in the said Schedule shall be given to the eligible individual subject to the production of the following alternate and viable means of identification, namely :—

(*i*) Aadhaar Enrolment ID slip if he had enrolled ; or

(*ii*) A copy of the request made for Aadhaar enrolment, as specified in sub-paragraph (ii) of paragraph 2 above along with any of the following documents namely :—

(*a*) voter identity card issued by the Election Commission of India ; or

(*b*) Permanent Account number (PAN) Card issued by the Income Tax Department ; or

(*c*) Passport; or

(d) Driving license issued by the Licensing Authority under the Motor Vehicles Act, 1988 (59 of 1988) ; or

(*e*) Certificate of identity having photo of individual issued by a Gazetted Officer on an *official* letter head ; or

(*f*) Bank Passbook containing Photo.

*Schedule*

| Sr. No. (1) | Demand No.C-6 2245, Relief on Account of Natural Calamities. (2) |
|---|---|
| 1 | 01 Drought-Expenditure as per norms of State Disaster Response Fund, (91) (05) Assistance to farmers for crop loss due to natural calamity. (Committed) (2245 2434) |
| 2 | 02 Floods, Cyclones, etc. 101 Gratuities Relief (91) (01) Cash doles, assistance to family of deceased persons and injured persons. (Committed) (2245 0155) |
| 3 | 02 Floods, Cyclones, etc. 101 Gratuities Relief (91) (02)Temporary Shelter, Food, clothing, supply of medicines etc. in relief camps. (Committed) (2245 0217) |
| 4 | 02 Floods, Cyclones, etc. 101 Gratuities Relief (91) (04) Other Items (Committed) (2245 0244) 31 Grants-in-aid (Non-Salary) |
| 5 | 02 Floods, Cyclones, etc. 101 Gratuities Relief (91) (05) Assistance to farmers due to crop loss due to nature. (Committed) (2245 2452) |
| 6 | 113, Assistance for repairs/reconstruction of Houses 91, Expenditure as per norms of State Response Fund (91) (01) Assistance for repairs/reconstruction of houses. (Committed) (2245 0271) |
| 7 | 117, Assistance to Farmers for Purchase of live stock 91,Expenditure as per norms of State Disaster Response Fund, (91) (01) Assistance to small and marginal farmers for purchase of live stock in lieu of dead animals. (Committed) (2245 0315) |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

ARUN KOLHE,
Financial Adviser and Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE.